# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०३.०६.२०२६ बुधवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :–**

दिनांक ०३.०६.२०२६ रोजी मा. जिल्हा न्यायाधीश–१० तथा तदर्थ सत्र न्यायाधीश विशेष कोर्ट पोक्सो नागपुर, श्री. एस. एस. मौदेकर साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ८१/२०२२ मधील, पोलीस ठाणे धंतोली येथील अप. क्र. ३९१/२०२१ कलम ३५४, ३७६(२)(जे) भा.दं.वि. सहकलम ४, ८, १२ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी सतीष केशवराव रोकडे, वय ६४ वर्षे, रा. १४५, हनुमान नगर, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ३५४ भा.दं.वि. कायद्यान्वये ०५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/– रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा तसेच, कलम १० पोक्सो कायद्यान्वये **०७ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २०,०००/– रू. दंड** आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा तसेच, कलम १२ पोक्सो कायद्यान्वये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/– रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.

दिनांक ३०.११.२०२१ चे २२.०० वा. ते २२.४५ वा चे दरम्यान, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, रहाटे कॉलोनी परीसरात कार्यक्रमाकरीता आलेल्या ३५ वर्षीय फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी हिला आरोपी याने तीचेसोबत बोलुन तीला रूम दाखविण्याचे बहाण्याने तीचेशी अश्लील वर्तन करून तिचा विनयभंग केला. तसेच, फिर्यादीचे ईतरही नातेवाईक लहान मुलींसोबत अश्लील गैरकृत्य केले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक ११.१२.२०२१ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन मसपोनि. श्रीमती रामटेके मॅडम यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती रश्मी खापर्डे मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. जॉन राफेल साहेब यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. अचल हरगुडे व मपोहवा. सुष्मा बेले यांनी काम पाहिले

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :– घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.०६.२०२६ चे २१.१५ वा. चे सुमारास, हुडकेश्वर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना त्यांना माहीती मिळाली की, नविन सुभेदार ले–आऊट, ठवरे कॉलोनी मैदान येथे पांढऱ्या रंगाच चौकडीचा शर्ट घातलेला ईसम हा सार्वजनिक ठिकाणी हातात शस्त्र घेवुन आरडा–ओरड करीत आहे. अशा माहीतीवरून, तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा ईसम दिसल्याने त्यास घेराव टाकुन, ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी मोठा चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नावे व पत्ता विचारले असता, त्याने सय्यद अशरफ अली सय्यद अजगर अली, वय ३५ वर्षे, रा. सिंदीबन, मोठा ताजबाग, सक्करदरा,

नागपुर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी मोठा चाकु किंमती ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. बजरंग जुनघरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे यशोधरानगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १२.०५.२०२६ चे २०.०० वा. ते दिनांक ०१.०६.२०२६ चे ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, प्लॉट नं. १७४५ बि ६७५, कुंदनलाल गुप्ता नगर, नुरी मस्जीद मागे, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती अंजुम अनीस कुरेशी, वय ३४ वर्षे ह्या आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह भाच्याचे लग्नाकरीता हैदराबाद (तेलंगणा) गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मागील जाळीची खिडकी तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख ४,००,०००/—रू. व सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४,६०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. अनंता पाटील ९५५२५५०५०३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे ईमामवाडा :—** ईशान राजु लांडगे, वय ३५ वर्षे, रा. पाचनल चौक, मुग्धा किराणा जवळ, ईमामवाडा, नागपूर हे दिनांक २२.०५.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ९ इंच, केस— काळे, अंगात— हिरव्या रंगाचा पांढऱ्या लाईनिंगचा शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे ईमामवाडा :—** अक्षय प्रशांत बोरकर, वय २२ वर्षे, रा. घर नं. ३९०, आनंद बुध्द विहार जवळ, सिरसपेठ, ईमामवाडा, नागपूर हा दिनांक ०१.०६.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ११ इंच, केस— काळे, अंगात— शर्ट व पॅन्ट घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो



ईशान



अक्षय

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**